महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

---

Email ID: itcell-rdd@mah.gov.in दूरध्वनी क्र.-०२२-२२०१६७३७
RTS३८२६/प्र.क्र.४१/मातंक. दिनांक : १०/०४/२०२६

---

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,सर्व.

**विषय:- २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्याबाबत**
**संदर्भ:-** मा.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त ,महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांचे दि.२० मार्च,२०२६ रोजीचे अर्धशासकीय पत्र

महोदय/महोदया,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन दिनांक २० मार्च,२०२६ रोजीच्या अर्धशासकीय पत्राची पत्र माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

२. उपरोक्त पत्रान्वये मा.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांनी २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्याबाबत तसेच विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार ग्रामीण नागरिकांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२००५ बाबत,राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी दि.२८ एप्रिल,२०२६ रोजी "सेवा हक्क दिनाच्या" निमित्ताने ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा तपशील उपरोक्त पत्रासोबतच्या प्रपत्र -अ मध्ये पाठविण्यात आला आहे.

३. मा.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांनी उपरोक्त पत्रान्वये निर्देश दिल्यानुसार दि.२८.०४.२०२६ रोजी सर्व ग्रामपंचायतीत ग्रामपंचायतीची विशेष सभा आयोजित करणेबाबत तसेच दि.१.५.२०२६ रोजी सर्व ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभेचे आयोजन करुन आयोगाने ठरवून दिलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी सर्व ग्रामपंचायतीमध्ये करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरुन संबंधतींना सूचना द्याव्यात,ही विनंती.

आपला ,

(प्रशांत पाटील )
उपसचिव , महाराष्ट्र शासन.